ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# मराठी ग्रामीण कांदबरी आणि शेतकरी जीवन चित्रण

**प्रा.डॉ.सौ.नलवडे कांचन विजय**
मराठी विभाग, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा मो. 9422692396

भारतासारख्या शेतीप्रधान देशात बहुसंख्य जनता शेतीवर अवलंबून आहे. त्यांचे जीवन शेती व निसर्ग या परस्पर घटकावर अवलंबून आहे. खेडयापाडयात, डोंगरदऱ्यात राहणाऱ्या लोकांचे प्रश्न, समस्या, त्यांचे जीवन हे शहरी, नागर जीवनापेक्षा वेगळे आहे. त्यांच्या जीवनात कष्ट, दुःख अधिक आहे. या शेतकऱ्यांचे शोषण करणारा वर्ग उच्चवर्गीय व शहरात राहणारा आहे. याकडे महात्मा जोतीराव फुले यांनी लक्ष वेधले. ग्रामीण जीवनातील शेतकऱ्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्याचा शेती हा व्यवसायही महत्वाचा. शेती पिकली तर सर्व उत्तम नाहीतर शेतकऱ्याच्या जीवनात दुःखाशिवाय काहीच नाही. या शेतकऱ्याचे शोषण शेटजी भटजीकडून कसे होते आणि त्याच्या अज्ञानामुळेही तो स्वतःच कसा बर्बाद होतो. त्याच्या दुर्दशेस तो स्वतःच कारणीभूत असतो. त्याला स्वतःलाच आत्मभान आले पाहिजे आणि शासनाकडूनही त्याला मदत झाली पाहिजे. यासंबंधीचे तर्कसुसंगत व परखड विचार ‘शेतकऱ्याचा आसूड’(1873) या ग्रंथामध्ये महात्मा फुल्यांनी मांडले आहेत. महात्मा फुले यांच्यानंतरही शेतकरी शेतमजूर या माणसाचा हुंकार ऐकविण्याचे काम कृष्णराव भालेकर, मुकुंदराव पाटील, नारायण मेघाजी लोखंडे, श्रीपतराव शिंदे, वालचंद कोठारी, भगवंत पाळेकर अशा लेखक पत्रकार, विचारवंत, सुधारक मंडळीनीही केलेले आहे. यानंतर 1888 मध्ये ‘बळीबा पाटील’ या कादंबरीत कृष्णराव भालेराव यांनी एकोणिसाव्या शतकातील शेतकरी आणि ग्रामीण कष्टकऱ्यांच्या जीवनाचे चित्रण केलेले आहे. 95 वर्षाचा बळीबा पाटील हाच या कादंबरीचा व्यापक स्वरूपाचा विचार करणारा नायक आहे. या कादंबरीविषयी डॉ.वासुदेव मुलाटे लिहितात, “एकीकडे महाराष्ट्रात पुनः पुन्हा येणारा दुष्काळ आणि या दुष्काळातही स्वतःच्या स्वार्थासाठी कष्टकरी शेतकऱ्यांचे गावकामगार व तत्सम ग्राम जीवनाशी संबंधीत शासकीय अंमलदारांकडून कशी पिळवणूक व छळ होतो. याचे चित्र जसे कृष्णराव भालेकरांनी रेखाटले तसेच भयावह दुष्काळामुळे होणारी, खेडूतांची वाताहत यांचेही वास्तवदर्शी चित्र रेखाटले.”[1]

महात्मा जोतीराव फुल्यांच्या प्रेरणेतून ही कादंबरी निर्माण झालेली आहे. हे उघडच आहे. परंतु ही कादंबरी भरघोस असा अनुभव देत नसल्यामुळे अनेक समीक्षकांनी तिच्या पहिलेपणावर आक्षेप घेतलेला आहे. परंतु ही ग्रामीण कादंबरी लिखाणाचा पहिला प्रयत्न आहे. हे मान्यच करावे लागते. यानंतर हरिभाऊ आपटे यांनी ‘काळ तर मोठा कठीण आला’ या शीर्षकाची 1898 मध्ये दीर्घकथा लिहिली आहे. या कथेतही दुष्काळामुळे एका शेतकऱ्याच्या कुटुंबाची आणि घरादाराची कशी वाताहत झाली याचे चित्रण अत्यंत अनुकंपेने रेखाटले आहे. या कथेनंतर 1903 मध्ये प्रसिद्ध झालेली ‘पिराजी पाटील’ ही रामचंद्र विनायक टिकेकर उर्फ धनुर्धारी यांची पहिली कादंबरी मानली जाते. दारिद्र्यावस्थेत गेलेला पिराजी आपली व कुटुंबाचीही कहाणी सांगतो. शेतकरी समाजाकडे सरकारने आणि समाजानेही लक्ष देण्याची गरज त्यातून व्यक्त झाली आहे. ‘पिराजी पाटील’ या कादंबरीनंतर ‘कसे दिवस जातील’(1925) ही ना.वि.कुलकर्णी यांची कांदबरी प्रसिद्ध झाली. शेती व्यवसाय मोडकळीस येऊन कर्जबाजारी झालेला आबा हा कादंबरीचा नायक उपजीविकेसाठी मुंबईला जातो. ही कादंबरी तशी शोकात्म अनुभव देते. पैसा

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

(1926) या कादंबरीत शेती हाच पैसा आहे. कष्ट केले तर शेती भरपूर पैसा मिळवून देऊ शकते हा विचार मांडला आहे. कादंबरीच्या शेवटी वामनला शेतीचे महत्त्व पटते. त्याचबरोबर रामतनय यांची 'खरा उद्धार' (1936) ही कादंबरीही शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेणारे सावकार आणि तत्कालीन समाजवास्तव मांडणारी आहे.

1920 नंतर मात्र साहित्यात बदल झाला. महाराष्ट्रात टिळक युगाचा अंत झाला आणि गांधीजींच्या नेतृत्त्वाचा प्रभाव वाढू लागला. महात्मा गांधीजींनी 'खेडयाकडे चला' असा संदेश दिला. भारतातील अधिक जनता ही खेडयातच राहते. भारतीय संस्कृतीची जपणूक खेडयातून होते. या खेडयात राहणाऱ्या लोकांच्या जीवनाचा विकास झाला पाहिजे. शेतकरी आणि त्याच्याशी जोडलेला इतर कष्टकरी समाज यांच्यात सुधारणा झाली पाहिजे. खेडयातील माणसांमध्ये बदल घडवून आणण्यासाठी समाजसुधारकांनी, राजकारण्यांनी पुढे आले पाहिजे. अशा भूमिकेतून खेडयाकडे चलाची हाक दिली आणि सर्वांचेच लक्ष खेडयाच्या सुधारणेकडे वळले. ग्रामीण भागातील शेतकरी आणि शेतमजूर, सामान्य माणूस यांच्यातील दारिद्रय, विषमता, अज्ञान, रूढी परंपरावरील विश्वास या सर्वात बदल करण्यासाठी व त्यांच्यात आत्मभाव निर्माण करण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. मार्क्सवादी, साम्यवादी विचारसरणीच्या लोकांनीही आपला मोर्चा खेडयाकडे वळवला. राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांनीही खेडयापाडयातील मुलांच्या शिक्षणासाठी प्रयत्न सुरू केले. याच काळात लेखक वर्गाचेही लक्ष ग्रामीण जीवनाकडे गेले व त्यांनीही खेडे, खेडयाचा परिसर, निसर्ग, तेथील माणूस याविषयी लिहायला सुरूवात केली. परंतु या स्वातंत्र्यपूर्व काळात लिहिल्या गेलेल्या ग्रामीण कादंबरीविषयी प्राचार्य रा.रं.बोराडे म्हणतात, "1960 पर्यंतच्या काळात जे ग्रामीण साहित्य लिहिलं गेल आहे. त्या ग्रामीण साहित्यात कृषी व्यवसायाशी प्रत्यक्ष संबंध नसलेल्या, पण ग्रामीण जीवनाचा घटक असलेल्या एखाद्या ग्रामस्थान आपल्या गावातल्या एखाद्या शेतकऱ्याच्या शेतात बांधावर उभे राहून आपल्या शहरी मित्राला ते शेत दाखववं तशा स्वरूपाच ते चित्रण आहे."[2] म्हणजे 1960 नंतरच्या लेखकांनीच ग्रामीण साहित्य समृद्ध करायला सुरूवात केली असेच म्हणाव लागेल.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शेतकऱ्यांचे जीवन उंचविण्यासाठी, सुधारण्यासाठी शासकीय पातळीवर प्रयत्न सुरू झाले. शेतकऱ्यांसाठी शिक्षण, आरोग्य,अनुदान, वीज, पाणी पुरवठयाच्या योजना, किटकनाशके किंवा रासायनिक खतांच्या योजनातून पाठबळ दिले गेले. परंतु छोटे शेतकरी कोरडवाहू, जमीनधारक, शेतमजूर यांच्या पदरात यातील किती फायदे मिळाले हा आज प्रश्नच आहे आज शेती ही निसर्गाची अवकृपा शासनाची निष्क्रियता, राजकारणाचा शेतकऱ्यांच्याकडे पाहण्याचा वेगळा दृष्टिकोन यातून शेतकऱ्याचे शोषणच होत आहे. असे दिसून येते. शेतकऱ्यांच्या शोषणाविषयी त्यांच्या अडचणीविषयी मराठी साहित्यात गंभीरपणे लिहिले गेलेले नाही. मराठी साहित्यात हा विषय आलेला आहे. परंतु शेतकऱ्यांच्या जीवनातील ताणतणाव, निर्माण होणाऱ्या समस्या याविषयी वास्तवाच्या पातळीवरून व खोलात जावून फारसे लिहिले गेलेले नाही. मराठी कादंबरीपुरता विचार केला तर पुढील काही कादंबऱ्या विचारात घेता येतील. र.वा.दिघे यांच्या 'पाणकळा' (1939) या कादंबरीत निसर्गाच्या पार्श्वभूमीवर खेडयातील शेतकऱ्यांचे अज्ञान, निसर्गावलंबी जीवन, दारिद्रय, शोषण या शोषणात पिळून निघणारी गरीब, श्रद्धाळू माणसे, भाबडी आणि क्रूर, दुष्ट बुद्धीची माणसे यांचेही तेवढेच वास्तववादी चित्रण आलेले आहे. तर आई आहे शेतात(1956), या कादंबरीत कूळकायद्यामुळे

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

जमीनदार आणि कूळ यांच्यात निर्माण झालेला संघर्ष, त्यामुळे दादाजींच्या घरात पेटलेला कलह, विघटीत होत चाललेली कुटुंबव्यवस्था असे ग्रामजीवनाचे दर्शन घडते तर म.भा. भोसले यांची 'समरांगण' (1942) ही कादंबरी शेतकरी आणि जमीनदार यांच्यामधील संघर्षावर आधारीत आहे.

रा.रं.बोराडे यांच्या 'चारापाणी'(1990) या कादंबरीत दुष्काळासारखी महत्त्वाची समस्या हाताळली आहे. महाराष्ट्रात वारंवार पडणारा दुष्काळ, अन्न, पाणी आणि गुरांचा चारा याचा तुटवडा यामुळे जगण्याचाच प्रश्न निर्माण होतो. या कादंबरीतील समस्या अन्नपाण्यापुरती सीमित नाही. तर त्यात कृषिकेंद्रित समाजातील 'चारा' हा महत्त्वाचे केंद्र बनतो. दुष्काळात जनावऱ्यांच्या चाऱ्यांची कमतरता निर्माण होते. दुष्काळामुळे जी परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्याकडे शासन, लोकनेते आणि समाज यांचा पाहण्याचा दृष्टिकोण निकोप नाही. याचबरोबर दुष्काळात अन्न, पाणी आणि चारा याविषयीच्या निर्माण होणाऱ्या समस्या महत्त्वाच्या आहेत. परंतु या कादंबरीत अन्न या समस्येकडे लक्ष दिलेले नाही. या संदर्भात डॉ.भीमराव वाघचौरे म्हणतात, "अन्नाच्या प्रश्नाचा साधा उल्लेखही कादंबरीला शिवत नाही. वास्तविक दुष्काळसदृश्य परिस्थितीत धान्य व चाऱ्याचाही प्रश्न हा सतत समप्रमाणात उद्भवत असतो. मात्र असे असतानाही फक्त पाण्याचा आणि त्या अनुषंगाने चाऱ्याचाही प्रश्न ती घेऊन येते. असे असले तरी या प्रश्नाची भीषणता दाहकताही येथे तितकीशी चित्रित होत नाही. पाण्याअभावी जनावरांचं तडफडण आणि त्यांच्या मरण्यातडफडण्यामुळे त्यांच्या मालकांच्या अंतःकरणाला चरे पडणं...... असे येथे फारस घडत नाही."[3] म्हणजेच या कादंबरीत समस्येची दाहकता व्यक्त होत नाही. परंतु एका दुर्लक्षित विषयाकडे लेखकाने लक्ष वेधले आहे हे खरेच, 'रिक्त अतिरिक्त'(2009) या कादंबरीत ऊसप्रश्नांची मांडणी केलेली आहे. महाराष्ट्रातील साखर कारखान्यांचा कारभार नेहमीच वादग्रस्त ठरलेला आहे. कारखान्यांकडून ऊस वेळेवर तोडून नेला जात नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. ऊसाचे वजन घटते. या कादंबरीतील नाथाप्पाचे कुटुंब ऊस न गेल्यामुळे अनेक समस्यांनी ग्रस्त आहे. नाथाप्पाच्या नातीचे लग्न ऊस जात नसल्यामुळे मोडले जाते. कुटुंबात ताणतणाव निर्माण होतो आणि या तणावामुळे नाथाप्पा ऊसाचे पीक जाळून स्वतःलाही त्यात जाळून घेतो. हा प्रवास शोकात्मिकेकडे जातो. आनंद यादवांच्या 'गोतावळा' (1971) या कादंबरीत नारबा या शेतमजूराच्या शोषणाची कहाणी येते. वयाच्या पाचव्या वर्षी वडील आणि चौदाव्या वर्षी आई मृत्यू पावल्यामुळे पोरक्या झालेल्या नारबाला रामू सोनावडयाकडे सालगडी म्हणून राहावे लागते. नारबाचे लग्न केले तर तो संपूर्ण लक्ष शेती कामावर देणार नाही म्हणून त्याचे एकप्रकारे शोषणच केले जाते. नारबाला आलेल्या एकटेपणामुळे तो शेतीशी, गुराढोरांशी, पशुपक्ष्यांशी, निसर्गाशी कमालीचा समरस होतो. सदानंद देशमुख यांनी 'बारोमास'(2002) या कादंबरीतील एकनाथ तनपुरे या शेतकऱ्याच्या मुलास उच्च शिक्षण घेऊनही डोनेशनशिवाय नोकरीच्या संधी उपलब्ध होत नाहीत. पारंपरिक व्यवसाय म्हणून शेतीचे कामही त्याला जमत नाही. ग्रामीण जीवनातील निसर्गाची अवकृपा, दुष्काळ, काळानुरूप वाढत जाणारा विविध ठिकाणचा भ्रष्टाचार, भौतिक वस्तूंचा हव्यास इ.मुळे निर्माण झालेल्या संघर्षमय परिस्थितीचे वास्तव चित्रण सदानंद देशमुखांनी या कादंबरीतून केले आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, खेडयात शिरलेले संधीसाधू राजकारण आणि भ्रष्टाचार, दारिद्रय आणि बेकारी इ. विविध घटकांना स्पर्श करणारी 'बारोमास' ही कादंबरी आहे.

अशोक कौतिक कोळी यांच्या ‘पाडा’ (2006) या कादंबरीत जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत शेतकरी कसा सपाट होतो. हे चित्रित केले आहे. ‘केळयांना भाव मिळाला पाहिजे’ ही मागणी या कादंबरीतील चांगदेव तापकीर याची आहे. यासाठी तो आंदोलन करतो. “सोना पिकावेल मालाला भाव तो ठरवू शकत नाही. व्यापारी, दलाल, गद्दार हून राहाले त्येच्या जीवनावर”(पृ. 23) या चांगदेवच्या वाक्यातून एका शेतकऱ्याची व्यथा मांडलेली आहे.” नाशिकचे दराकक्षवाले, नागपूरकडचे संतरीवाले, नगरचे ऊसवाले त्यांच्या समस्या सारक्या हायती.”[4] चांगदेव हा केळयांना भाव मिळावा म्हणून आंदोलन करतो पण अपयशच त्याच्या पदरी पडते. कौटुंबिक जीवनातही तो उद्‌ध्वस्त होतो.

‘रानखळगी’ (1988) ही डॉ.भीमराव वाघचौरे यांची पहिलीच कादंबरी. या कादंबरीत दुष्काळामुळे दामूच्या कुटुंबाची झालेली वाताहत येते. दायगाव या लहानशा खेडयात दामा व त्याचे कुटुंबीय राहत असतात. पोटापुरते शेत असल्याने त्या शेतात राबून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह दामूचे आई वडील करीत असतात. एके वर्षी जास्त पाऊस पडल्यामुळे आप्पाच्या शेतातील पिकाचे नुकसान होते. या घटनेपासून खऱ्या अर्थाने दामाच्या कुटुंबाच्या वाताहतीला सुरूवात होते. पुढे सततच्या दुष्काळामुळे दामूच्या कुटुंबाला अनेक संकटाना तोंड द्यावे लागते. शासनाने काहीतरी ठोस उपाययोजना शेतकऱ्यांसाठी निर्माण कराव्यात असे सूचन ही कादंबरी करते. रानखळगी ही कादंबरी ग्रामीण वाङ्‌मयाच्या परंपरेने जवळ जाणारी, शेतकऱ्याचे वास्तव चित्रण करणारी, दुष्काळातील जीवन संघर्ष मांडणारी आहे.

शेषराव मोहिते यांची ‘अस जगणं तोलाच’(1994) ही पहिलीच कादंबरी. व्हंताला या कर्नाटकच्या सीमेजवळील एका लहानशा खेडयात राहणाऱ्या हरीबा व कासाबाई या शेतकरी दाम्पत्याच्या कुटुंबाची ही कथा आहे. हाणमू आणि नामू या मुलांच्या लग्नासाठी विष्णू कारभारी या सावकाराकडून कर्ज काढले जाते. शेतीला कितीही पैसा घातला, कष्ट केले तरीही कर्ज फिटत नाही. कुंटुबाची दैनाच होते. यावर लेखकाने शेतकऱ्यांची मुले शिकली पाहिजेत असा तोडगा सुचविला आहे. शेती फायदेशीर करायची असेल तर त्याला शिक्षणाचीही गरज आहे. हेच या कादंबरीतून सूचित केले आहे. या कादंबरीतील आणखी एक वेगळेपणा लक्षात येतो तो म्हणजे या कादंबरीतील स्त्रिया ग्रामीण शेतकरी माणसाचे शहरी माणसाकडून शोषण होते. तसेच त्यांच्या घरातील स्त्रीही पुरूषप्रधान संस्कृतीकडून शोषण होणारी शोषितांची शोषित आहे. ग्रामीण भागातील खासगी स्वरूपाची सावकारी आणि या सावकारीच्या आधाराने गरीब शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक, त्यातून त्याच्या संसाराची होणारी परवड याचे चित्रण या कादंबरीत आले आहे. लेखकाने ग्रामीण माणूस त्याची मानसिकता, समाजातील ताणतणाव, तेथील राजकारण, अर्थव्यवस्था त्यांच्या जीवनातील प्रश्न, समस्या यांची मांडणी अतिशय तळमळीने केलेली आहे.

बाबाराव मुसळे यांची ‘हाल्या हाल्या दुधू दे’(1985) ही कादंबरी शेतकऱ्याची शोकांतिका चित्रित करणारी आहे. ग्यानबा मुळे हा शेतकरी मुलीच्या लग्नासाठी सावकाराला शेतीचे खरेदीखत करून देतो आणि त्याच्या जीवनातील संकटांनाच सुरूवात होते. सरकारी योजनामधूनही त्याला फायदा लाभत नाही. इकडे कर्ज काढून विवाह केलेल्या मुलीलाही संसारसुख लाभत नाही. ती माहेरी येते. कर्ज फेडण्यासाठी शेतात घेतलेले पीकही व्यवस्थित

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

येत नाही. त्यातच ग्यानबाला कॅन्सर होतो. या सर्व संकटाला तोंड देत शेवटी ग्यानबा मरण पावतो. या कादंबरीत निवेदनासाठी वऱ्हाडी बोलीभाषेचा केलेला वापर योग्य आहे, असे वाटते.

'कापूसकाळ' ही केलास दौंड यांची 2009 मध्ये प्रकाशित झालेली कादंबरी आहे. बाबाराव मुसळे यांच्या 'हाल्या हाल्या दुधू दे' या कादंबरीतून कापसाचे पीक घेणाऱ्या एका शेतकऱ्याच्या दुःखाची कौटुंबिक कथा ज्याप्रमाणे मांडली आहे. तशी कथा 'कापूसकाळ' ची नाही. कापूस पिकविणाऱ्या अनेक शेतकऱ्यांच्या शोषणाची व त्यांच्या दुःखमय जगण्याची ही कथा आहे. व्यापारी, पुढारी आणि शासकीय कर्मचारी शेतकऱ्यांचे शोषण कसे करतात. ते या कादंबरीत रेखाटले आहे. आजच्या ग्रामीण शेतकऱ्यांची व्यथा मांडणारी, वास्तवदर्शी कथानक असलेली, ग्रामीण समाज जीवनाला स्पर्श करणारी, शासनव्यवस्थेवर भाष्य करणारी अशी ही कादंबरी आहे. शेतकरी आत्महत्येचा मार्ग का पत्करतात यामागचे सखोल उत्तर देण्याचा प्रयत्न कैलास दौंड यांनी या कादंबरीत केला आहे. या कादंबरीतून समकालीन शेतकरी, शेती आणि एकूणच आजची व्यवस्था कादंबरीकाराने तितक्याच तटस्थतेने मांडलेली आहे.

## समारोप

म.जोतीराव फुले कृष्णराव भालेकर यांनी सुरूवातीच्या काळात त्यांच्या साहित्यामधून शेतकऱ्यांच्या दरिद्री कष्टमय व दुःखकारक जीवनाविषयी अतिशय पोटतिडकीने लिहीले आहे. नंतरच्या काळात ग्रामीण भागामध्ये राहणाऱ्या शेतकऱ्यांच्या जीवनावर आधारित कादंबरी लेखन फारसे झालेले नाही. याचा अर्थ मराठी साहित्यात हा विषय आलाच नाही असे नाही परंतु शेतकऱ्यांच्या जीवनातील सूक्ष्म ताणतणाव आणि त्याला कारणीभूत असलेले घटक याविषयी वास्तवाच्या पातळीवरून व खोलात जाऊन लिहिले नाही. परंतु स्वातंत्र्योत्तर कालखंडात 1975 नंतर मात्र ज्या काही शेतकऱ्यांच्या जीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत. त्यामधून शेतकऱ्यांचे जीवन, त्यांचे प्रष्न आणि समस्या, राजकारन, अर्थव्यवस्था, सहकार क्षेत्रातील श्ष्टाचार या सर्वांचा शेतकऱ्यांना होणारा त्रास अशा सर्व प्रश्नांना कवेत घेणारे वास्तवदर्शी लेखन झालेले आहे.

## संदर्भ

1) मुलाटे डॉ.वासुदेव, 'ग्रामीण साहित्य स्वरूप व दिशा,' कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथामवृत्ती, जून 1994, पृ.12
2) बारोडे रा.रं., 'ग्रामीण साहित्य : चळवळ आणि निर्मिती', साकेत प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 1992, पृ.7
3) डॉ.वाघचौरे भीमराव, रा.रं.बोराडे यांचे साहित्यः स्वरूप आणि आस्वाद, पृ.178
4) कोळी अशोक कौतिक, 'पाडा' शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथमावृत्ती 2006, पृ.23, 28